# पुणे महानगर परिवहन महामंडळ

## <u>प्रेसनोट</u>

# पीएमपीएमएल कडून मनपा – सिप्ला सेंटर – मनपा हा वर्तुळ बसमार्ग सुरू.

- **<u>म.न.पा. कॉंग्रेस भवन – राहुल पार्क – आदित्य गार्डन सिटी – सिप्ला सेंटर – म.न.पा. कॉंग्रेस भवन असा वर्तुळ मार्ग.</u>**
- **<u>सिप्ला सेंटर भागातील प्रवासी नागरिकांना या बससेवेमुळे मोठा दिलासा.</u>**

पीएमपीएमएल कडून आज शनिवार, दिनांक ०२/०३/२०२४ पासून मार्ग क्रमांक ८० मनपा – सिप्ला सेंटर – मनपा हा नवीन बसमार्ग सुरू करण्यात आला. सिप्ला सेंटर येथे पुणे महानगर परिवहन महामंडळाचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. डॉ. संजय कोलते व पुणे महानगरपालिकेच्या माजी विरोधी पक्ष नेत्या मा. सौ. दिपाली धुमाळ यांच्या हस्ते बसला हिरवा झेंडा दाखवून बससेवेचा शुभारंभ करून लोकार्पण सोहळा पार पडला.

याप्रसंगी श्री. बाबा धुमाळ, जेष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष नंदकुमार बोधाई, पीएमपीएमएलचे चीफ ट्रान्सपोर्ट मॅनेजर (ऑपरेशन) श्री. सतीश गव्हाणे, कामगार व जनता संपर्क अधिकारी श्री. सतीश गाटे, कोथरूड डेपो मॅनेजर श्री. राजेंद्र गाजरे, कोथरूड आगार अभियंता श्री. विलास मते यांची प्रमुख उपस्थिती होती.

मार्ग क्रमांक ८० चा मार्ग म.न.पा. कॉंग्रेस भवन – राहुल पार्क – आदित्य गार्डन सिटी – सिप्ला सेंटर – म.न.पा. कॉंग्रेस भवन असा वर्तुळ मार्ग असणार आहे. सध्या या मार्गावर १ बसेसद्वारे साधारणपणे दिवसभरात एकूण ८ खेपा होणार आहेत. मनपा – सिप्ला सेंटर – मनपा या वर्तुळ मार्गावर पहिली बस सकाळी ०८:१० वा. तर शेवटची बस रात्री १०:३० वा. आहे.

मनपा – सिप्ला सेंटर – मनपा या वर्तुळ बसेवेचा लाभ जास्तीत जास्त प्रवाशी नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन उपस्थित मान्यवरांनी व पीएमपीएमएलच्या अधिकाऱ्यांनी केले.

sd/-

**चिफ ट्रान्सपोर्ट मॅनेजर (ऑपरेशन)**
**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**

---

दि. ०२/०३/२०२४

मा. संपादक,
दैनिक ..........
यांजकडेस...

महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्ध होणेविषयी विनंती आहे.
मा. स. कळावे.

sd/-

कामगार व जनता संपर्क अधिकारी
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.